ई-मेल द्वारे

**जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर**

---

संदर्भ : दिनांक १३/०९/२०२६ रोजी प्रसिध्द झालेली शिपाई पदाकरीताची प्रतिक्षा यादी.
संदर्भ : जिल्हा न्यायालय, अहमदनगर आदेश क्र.बी-०४/आस्था.२९२९/२०२६, दि.०८/०९/२०२६
संदर्भ : प्रबंधक, यांची दिनांक ०९/०९/२०२६ रोजीची टिपणी.

---

**आ दे श :-**

**क्रमांक बी-०४/आस्था.१९ २४ /२०२६** :- निम्नस्वाक्षरीकार हे खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेत. **सदरचा आदेश तात्काळ अंमलात येईल.**

**'भाग-१' - नविन नेमणूक.**

| क्र. | उमेदवाराचे नाव, निवड यादी क्रमांक व पत्ता. | नविन नेमणूकीचे ठिकाण. |
|---|---|---|
| १) | श्री. निखील मनोहर शेडमाके (Nikhil Manohar Shedmake), जिल्हा न्यायालय, अहमदनगर शिपाई पदाच्या प्रतिक्षा यादीवरील उमेदवार क्रमांक १५, राहणार रामनगर, वार्ड नंबर २०, गडचिरोली. | **तात्पुरत्या स्वरुपात नविन नेमणूकीने शिपाई म्हणून** सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, **श्रीरामपूर** येथे श्री. चक्रधर गोविंदा आवळे यांचे ऐवजी. |

**'भाग-२'**

१) उपरोक्त भाग-१ मधील उमेदवाराची नेमणूक ही सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक चारित्र-२०१७/प्र.क. ४८३/२०१७/१६-अ, दिनांक २८ ऑगस्ट २०१७ नूसार उमेदवाराची चारित्र व पूर्वचारित्र याची पडताळणीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. **उमेदवाराने सादर केलेली माहिती असत्य आढळून आल्यास प्रस्तुतचा नियुक्ती आदेश रद्दबातल करुन भारतीय दंडसंहितेनूसार फौजदारी कारवाई तसेच शासन सेवेत कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल.**

२) उपरोक्त भाग-१ मधील शिपाई म्हणुन नविन नेमणूक दिलेल्या कर्मचा-याची **वेतन स्तर-एस १ (१५०००-४७६००)** मध्ये नेमणूक करणेत आलेली आहे.

३) उपरोक्त भाग-१ मधील नवनियुक्त उमेदवारास सूचित करणेत येते की, त्यांना दिलेली नियुक्ती ही तातपुरत्या स्वरुपाची असुन त्यांना कोणतेही कारण न देता व नोटीस न देता केव्हाही सेवेतुन कमी करणेत येईल.

४) उपरोक्त भाग-१ मधील नवनियुक्त उमेदवारास सूचित करणेत येते की, हजर झालेनंतर त्यांना त्यांचे पदाचा राजीनामा दयावयाचा असल्यास त्यांनी सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क. ३३/९२/८, दिनांक ०२/१२/१९९७ प्रमाणे योग्य तो अर्ज सादर करावा.

५) उपरोक्त भाग-१ मधील नवनियुक्त उमेदवारास सूचित करणेत येते की, नेमणुक दिलेल्या न्यायालयात सदर आदेश मिळालेपासून सात दिवसांचे आत हजर न झाल्यास त्यांना देण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल व त्यांचे निवड यादीतील नाव कमी करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

०९/०९
( एस. बी. कचरे )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
अहमदनगर

जिल्हा न्यायालय, अहमदनगर, ))
दिनांक : ०९/०९/२०२६. ))

**क्रमांक बी-०४/आस्था.१९ २४ /२०२६**

**प्रत माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषीत :-**

१) माननीय सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, श्रीरामपूर.
२) अधीक्षक, कार्यव्य/ले.व वि., जिल्हा न्यायालय, अहमदनगर.
३) संबंधित उमेदवार - ई मेल द्वारे.
४) जिल्हा प्रणाली व्यवस्थापक यांनी प्रस्तुतचा आदेश कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.
५) कार्यालयीन संचिका.

०९/०९/२६
( एस. एन. कंडू )
प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय,
अहमदनगर

जिल्हा न्यायालय, अहमदनगर, ))
दिनांक : ०९/०९/२०२६. ))